पनवेल (प्रतिनिधी) नविन पनवेल येथे सेक्टर १ एस परिसरातील भीमनगर झोपडपट्टीतील नागरिकांना ये-जा करण्यासाठी शबरी हॉटेलपुढील उघडया नाल्यावर बांधलेले लोखंडी पूल सिडकोच्या अतिक्रमण विभागाकडून तोडण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर व नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी सिडकोच्या कार्यालयात जावून याचा जाब विचारला आणि हा लोखंडी पूल पूर्ववत करून द्या, आमच्याशी गाठ आहे, अशा शब्दात सिडकोला ठणकावले.

भीमनगर झोपडपट्टीतील नागरिकांना मोठया नाल्यातून ये-जा करावी लागत होती. त्यामुळे लहान मुलांच्या जीवावर बेतलेल्या वाटेवरील नाल्यावर येथील रहिवाशांच्या मागणीनुसार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या स्वखर्चातून येथील नागरिकांच्या सोयीसाठी हा लोखंडी पूल उभारून दिला होता. यामुळे लहान मुले, महिला, वृध्दांना दिलासा मिळाला होता. परंतु सिडकोच्या मुजोर प्रशासनाने हा पूल अनधिकृत ठरवून यावर हातोडा हाणला. गोरगरीब रहिवांशीची वाट बंद झाल्याने संतप्त रहिवाशांनी सिडको कार्यालय गाठून सिडको प्रशासन हाय हाय करत सिडकोच्या विरोधात आक्रोश केला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, नगराध्यक्षा चारूशिला घरत, नगरसेवक प्रकाश बिनेदार, शहर कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, यांच्यासह युवा नेते किशोर चौतमोल, सुधीर मोरे, संजय ननावरे, मनोहर मुंबईकर, राकोश गावडे, पप्पू साळवे, विठाबाई सावंत, प्रमिला वानखेडे, कविता पवार, सिंधु हिरे, आशा केदारे, संजय मोकल, श्रीचंद भंडारी आदी कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भिमनगरच्या झोपडीवासियांना दिलासा देत हा लोखंडी पूल येत्या दोन दिवसात पूर्ववत करून दिला जाईल, असे सांगितले. त्यांनी संतप्त नागरिकांना धीर देत शांततेने सहकार्य करण्याचे आवाहन केले.